शुक्रवार दि.१४ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत     संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१४९ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# राजन साळवी यांचा अखेर शिवसेनेत प्रवेश

# उपमुख्यमंत्री शिंदे यांनी धनुष्यबाण दिला हाती

## पूर्ण रत्नागिरी जिल्हा भगवामय करू–उदय सामंत; उद्धव ठाकरे यांना जबर झटका

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राजन साळवी यांनी ठाणे येथे उपमुख्यमंत्री व शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश केला आहे. एकनाथ शिंदे हे आपले राजकीय गुरु असल्याचे राजन साळवी यांनी म्हंटले आहे. ठाणे येथील आनंद आश्रमात राजन साळवी यांनी एकनाथ शिंदे यांच्यासह स्वर्गीय आनंद दिघे यांच्या प्रतिमेचे दर्शन घेतले.

पक्षात प्रवेश केल्यानंतर राजन साळवी म्हणाले, ९ तारीख या दिवशी भाईंचा वाढदिवस असतो. त्या दिवशी मी भाईंना भेटलो आणि म्हणालो की या शुभ दिवशी मला आता पक्षात यायचे आहे. त्यावेळी माझ्यासोबत रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. कुटुंबातला सदस्य म्हणून भाईंनी माझ्यावर प्रेम केले. एक छोटा भाऊ म्हणून मला त्यांनी मार्गदर्शन दिले. एक दुःख आहे नक्कीच भाई मुख्यमंत्री होत असताना मी त्यांच्या सोबत राहू शकलो नाही. २००६ ला मी निवडणुकीत मी पराभूत झालो.

२०२४ च्या निवडणुकीत मला पराभवाला सामोरे जावे लागले. याला जबाबदार कोण हे आपल्याला माहीत आहे. हा पराभव मला आणि माझ्या कुटुंबाच्या जिव्हारी लागला. माझ्या पराभवाला जी माणसे कारणीभूत आहेत, त्या संबंधीची माहिती तसेच पुरावे मी उद्धव ठाकरे यांच्याकडे दिले होते. त्यानंतर मला वाटले आता थांबावे, पण मतदारसंघातील माणसे, त्यांचा विकास, जिल्ह्याचा विकास यासाठी मी पुन्हा उमेदीने उभे राहिले पाहिजे असे आग्रह या मंडळींनी धरला. विकासाच्या दृष्टीने विचार करता एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व महाराष्ट्राने स्वीकारले आहे. त्यांच्या नेतृत्वात पुन्हा एकदा शिवसेना, धनुष्यबाण घेऊन लोकांमध्ये जाऊ, असे राजन साळवी म्हणाले.

राजन साळवी म्हणाले, दुधात साखर पडली की दूध मधुर होते, तसेच आम्ही आता शिवसेनेत प्रवेश केल्यावर पुढे सगळे मधुरच होणार. मी भाईला सांगू इच्छितो मला काही नको. मला कशाची अपेक्षा नाही. मात्र, माझे कार्यकर्ते, माझे पदाधिकारी यांना मान सन्मान मिळाला पाहिजे, अशी इच्छा राजन साळवी यांनी व्यक्त केली आहे.यावेळी बोलताना उदय सामंत म्हणाले, साळवी साहेब आपण शिवसेना वाढवत असताना धनुष्यबाण घेऊनच शिवसेना वाढवली. मात्र, आता बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांच्या शिवसेनेचे धनुष्यबाण शिवसेनेकडेच ठेवण्याचे पवित्र काम एकनाथ शिंदे साहेब यांनी केले आहे. आपण एक कुटुंब म्हणून काम करतो आणि कुटुंब प्रमुख म्हणून एकनाथ शिंदे काम करतात. पूर्ण रत्नागिरी जिल्हा भगवामय करायचा आहे, मी तुम्हाला शब्द देतो की आपण सगळे मिळून हे काम करू.दरम्यान, राजन साळवी यांचा शिवसेना पक्षप्रवेशावेळी ठाकरे गटाच्या रत्नागिरी जिल्हा समन्वयक रवी डोळस यांनी



पक्षविरोधी कारवाया केल्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटातून हकालपट्टी करण्यात आली आहे.रत्नागिरी जिल्ह्यातील माजी आमदार राजन साळवी यांनी पक्षातील उपनेते पदाचा कालच राजीनामा दिला होता. गेल्या अनेक दिवसांपासून राजन साळवी हे ठाकरे गटातून बाहेर पडणार असल्याच्या चर्चा सुरू होत्या. त्यांनी दिलेल्या उपनेते पदाच्या राजीनाम्यानंतर यावर आता शिक्कामोर्तब झाले होते.राजन साळवी हे शिवसेनेचे विशेषतः मातोश्रीशी एकनिष्ठ नेते अशी त्यांची ओळख होती. मात्र, अलीकडच्या काळात विनायक राऊत यांच्याशी त्यांचा वाद झाला आणि उद्धव ठाकरे यांनी देखील विनायक राऊत यांचीच बाजू उचलून धरल्याने राजन साळवी यांचे मन दुखावले होते. यामुळेच त्यांनी आता ठाकरे गटाला रामराम करण्याचा निर्णय घेतला असल्याचे बोलले जाते.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, माझ्या मुख्यमंत्री काळात एवढे निर्णय आम्ही घेतले, एवढे प्रकल्प आम्ही सुरू केले, कल्याणकारी योजना लाडकी बहीण, लाडका भाऊ, लाडका शेतकरी, लाडका ज्येष्ठ असे अनेक निर्णय आम्ही घेतले. विकासाचा अजेंडा घेऊन जाणारे आमचे सरकार आणि शिवसेना आहे आणि म्हणून शिवसेनेत अनेक नेते येत आहेत, असे एकनाथ शिंदे म्हणाले आहेत.एकनाथ शिंदे यांनी बंड पुकारल्यानंतर अनेक आमदार शिंदे गटात गेले होते. यावेळी मोजके आमदारच उद्धव ठाकरे यांच्या बाजूने एकनिष्ठेने उभे होते, यात राजन साळवी यांचा समावेश होता. महाविकास आघाडीची सत्ता गेल्यावर राजन साळवी यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईला देखील सामोरे जावे लागले होते. तरी देखील त्यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडली नव्हती.राजन साळवी मातोश्रीचे निष्ठावंत अशी त्यांची ओळख आहे. मात्र, त्यांनी ठाकरे गटाला सोडण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय घेण्यामागे विधानसभा निवडणुकीच्या वेळेस झालेला विनायक राऊत यांच्याशी वाद. तसेच या वादानंतर उद्धव ठाकरे यांनी विनायक राऊत यांची बाजू उचलून धरली. या कारणामुळे राजन साळवी यांचे मन प्रचंड दुखावले होते. विधानसभा निवडणुकीत विनायक राऊत यांनी राजन साळवी यांना मदत केली नाही आणि अखेर त्यांचा पराभव झाला होता. यावर चर्चा करण्यासाठी विनायक राऊत आणि राजन साळवी मातोश्रीवर गेले होते. तेव्हा तुम्हाला दुसऱ्या पक्षात जायचे असेल तर दरवाजे उघडे आहेत, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी राजन साळवी यांनाच सुनावले होते. दुखावलेल्या मनाने अखेर राजन साळवी यांनी एकनाथ शिंदे यांच्या पक्षात जाण्याचा निर्णय घेतला. यामुळे आता शिंदे गटाची कोकणात आणखी ताकद वाढण्यास मदत होणार असल्याचे बोलले जात आहे.

# भगवानगडाला थेरला ग्रामस्थांची २ कोटी १ लक्ष रुपये देणगी जाहीर

## करोडो रुपयांचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भगवानगड । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.



श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे थेरला (ता.पाटोदा जि.बीड ) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही २ कोटी १ लाख रुपये झाली. नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. या भव्य दिव्य मंदिरासाठी लागणारा खर्च अंदाजे ३२ कोटी रूपये इतका आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

# कंधार तालुक्यातील रानोवनी वाटसरूंना गारुड घालतोय पळस फुलाचा रंगमहिमा!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

शिशिराची थंडी ओसरत असतानाच निष्पर्ण झालेल्या पळसाच्या वृक्षावर गडद लाल, नारंगी, तांबड्या, गडद लाल केशरी रंगाची धुमारे ओसाड माळरानावर अगदी दिमाखात रंगोत्सव साजरा करत आहेत. सध्या कंधार तालुक्यातील फुलवळ, गऊळ, आंबुलगा,दिग्रस इतर खेडोपाड्यात प्रवास करणाऱ्या वाटसरूंना ओसाड माळरानावर अगदी रस्त्यांच्या कडेला ये–जा करणाऱ्या वाटसरूंचे लक्ष वेधण्याचे काम पळस वृक्ष करत असून निसर्गाची ही मोहक रंग उधळण वाटसरूंच्या डोळ्यांना भुरळ घालत आहे. पानगळ झालेल्या बोडक्या शिवारात पळसाच्या फुलण्याने वसंताच्या आगमनाची चाहूल लागल्याचे चित्र आहे.



परंतु कालांतराने ग्रामस्थांसह संबंधित विभागाच्या दुर्लक्षामुळे येथील वनराई हळूहळू लोप पावत चालली आहे.परिसरात साग, कडुनिंबासह पळस आदी वृक्षांची निसर्गराजी विरळ प्रमाणात आहे. हिवाळा संपताच पिवळसर गवताने आच्छादित माळरान हिरवळीपासून मुक्त झाले आणि त्यावर वसंताच्या आगमनासाठीचा हा पळस फुलांचा उत्सव रस्त्यांवरून मार्गक्रमण करणाऱ्या वाटसरूंचे लक्ष वेधून घेत आहे.साधारणतः पंधरा ते वीस वर्षांपूर्वी पळस वृक्षाला कंधार परिसरात अनन्यसाधारण महत्व होते. जेवणासाठी पळसाच्या पानांची पत्रावळी आणि द्रोण यासाठी मोठ्या प्रमाणात वापर व्हायचा.परंतु दरम्यानच्या कालावधीत कागदी, प्लास्टिक आणि थर्मोकोलच्या कृत्रिम पत्रावळीचा वापर वाढला आहे. याबरोबरच आयुर्वेदिक दृष्ट्या बहुगुणी असणाऱ्या पळसाच्या फुलांना पाण्यात भिजत ठेऊन त्यापासून होळी, धुलीवंदन, रंगपंचमीसाठी रंग तयार केला जायचा जो कुठल्याही रासायनिक रंगापेक्षा अतिउत्तम मानला जातो.ज्यामुळे त्वचारोग नाहीसे होतात,असे आयुर्वेदात सांगितले आहे.परंतु ही पारंपरिक माहिती आत्ताच्या पिढीपर्यंत येत नसल्याने रंगपंचमीत वारेमाप रासायनिक रंगांचा वापर सररास होत आहे.हल्ली पळस वृक्षांचे कमी झालेले महत्व त्यांच्या विरळ होण्याचे कारण बनत आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो.असे असले तरी उदास आणि खिन्न झालेल्या ओसाड शिवारात गडद लाल, नारंगी, तांबड्या रंगात फुललेला पळस निसर्ग मनालाही भुरळ घालत आहे की काय? असा भास होतो. कविमनासह भ्रमरालाही साद घालणारा हा पळस वाटसरूंनाही आकर्षित करत आहे.

# रिसनगाव येथील विविध कामामध्ये निपक्षपाती चौकशी करून दोषींवर कठोर कार्यवाही करण्याची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

मौजे रिसनगाव ता. लोहा येथे मं.ग्रा.रो.ह.यो. अंर्तगत रस्ता व पेव्हर ब्लोक अश्या पद्धतीच्या कामांची वर्ककोड तयार करून एकाच रस्त्यावरती विविध कामे दाखविले आहेत. सदरील खालील प्रमाणे आहेत.१आष्टुर रोड ते सुभाष पवार यांचे घर ठउ१२३४७४४५८९,२० लक्ष,२अंगद पवार ते सुभाष पवार यांचे घर RC 1235747113, १० लक्ष,३सुभाष पवार ते बळी मोकले यांचे घर RC 1235747257, १० लक्ष,४बळी मोकले ते भीमा पवार यांचे घर RC 1235747259, १० लक्ष,५भीमा पवार ते श्रीहरी पवार यांचे घर RC 1235747260, १० लक्ष,६भीमराव मोकले ते साधू महाराज यांचे घर RC 1235747263, १० लक्ष केलेल्या कामापैकी क्र. १ चे काम आष्टुर रोड ते सुभाष पवार यांच्या घरापर्यंत वर्ककोड RC1234744589, २० लक्ष. अशी मंजूरी असून ते पूर्ण करून त्या कामावर इतर क्र. २ ते ६ प्रमाणे बनावट कामे दर्शउन शासनाची दिशाभूल करून लाखो रुपयाचा निधी हडप करण्यात आला आहे.

सदरील कामे म.ग्रा.रो.ह.यो. अंर्तगत करण्यात आली आहेत या कामाव्यतिरिक्त अनेक सीसी रस्ता व पेव्हर ब्लोक ची कामे रीसनगाव येथे बोगस बनावट पद्धतीते झालेली आहेत. प्रत्यक्ष दर्शनी आपण चौकशी अंती आपल्या निदर्शनास येईल कि, सदरील कामाची ठिकाणी करण्यात आली आहे त्या ठिकाणी पासून क्र. १ चे काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित क्र.२ तेः ६ पर्यंतचे कामे हे. म.ग्रा.रो.ह.यो. यंत्रणेच्या कर्मचारी (गटविकास अधिकारी) यांच्यासोबत आर्थिक हित संबध राखून करण्यात आलेली आहेत. सदरील कामांची उर्वरित देय क्र. शासनाची अदा करण्यात आले तर सर्वस्वी आपण जबाबदार राहताल याची नोंद घ्यावी तरी मे.गटविकास अधिकारी साहेबांनी ग्रामंपंचायतचे म.ग्रा.रो.ह.यो. चे खाते गोठून संबधित दोषी व ग्रामसेवक यांना निलंबित करून फौजदारी गुन्हा दाखल करावा असे नाही झाल्यास पुढील काही दिवसात मी छत्रपती संभाजी नगर हायकोर्ट मध्ये मी जाणार आहे याची शासनाने दाखल घ्यावी.अशी मागणी गोविंदराव सर्जेराव हाबगुंडे तालुका अध्यक्ष सेवा जनशक्ती पार्टी लोहा यांनी केली आहे.

# नायगावात राज्य भाषा मराठीच्या पेपरला ५९ विद्यार्थ्यांनी फिरवली पाठ

## २५४७ पैकी २४८८ विद्यार्थ्यांनीच परीक्षा दिली

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

इयत्ता १२ वी च्या परीक्षेला दिनांक अकरा फेब्रुवारी रोजी सुरवात झाली असून दिनांक १३ रोजी राज्य भाषा मराठी हा विषय होता.यामध्ये नायगाव तालुक्यात ९ परीक्षा केंद्रावर २५४७ पैकी २४८८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून,५९ विद्यार्थी आनूपस्थित राहिल्याने ते परीक्षे पासून वंचित राहिले आहेत अशी माहिती नायगाव परिरक्षक कार्यालय अधिकारी आनंद एन . रेंनगुंटवार यांनी दिली.

परीक्षा केंद्रावर साहित्य पोहचवणे ते साहित्य जमा करून पोस्ट कार्यालय मार्फत बोर्ड कडे पाठवणे ही जबाबदारी आनंद रेंनगुंटवार आपल्या सहायक परीरक्षक असलेल्या चंद्रकांत आमलापुरे,एस डी पाचलिंग बालाजी पटलेवाड,रुपेश गाडेवाड,आंगरोड, आणि मठपती या सह अन्य एकूण २५ शिलेदार यांच्या सह सेवक वर्ग यांना साथीला घेऊन अतिशय चोख पणे करीत आहेत.

# बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत ध्वनी प्रदूषण मुक्त करण्याचा संकल्प-सर्व स्तरातून वाहतूक पोलिसांच कौतुक

## परळी शहर पोलिसांची कर्कश आवाज असलेल्या बुलेटसह अनेक वाहनधारकावर धडक कार्यवाही!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**





बीड जिल्हयाचे पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, अप्पर अधिक्षक चेतना तिडके,सचिन पानडकर, परळी शहर पो.नि.नाचन व पो.नि.सुभाष सानप यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतूक शाखा व परळी शहर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने परळी शहरातील कर्णकर्कश सायलेंसर, फॅन्सी नंबर प्लेट लावणाऱ्या वाहनांवर धडक कार्यवाही मोहीम सुरू केल्याने वाहनचालकांत खळबळ माजली आहे.

परळी शहरातील धूम स्टाईल वाहने चालवणाऱ्या मुळे अनेक अपघाताच्या घटना घडल्या आहेत. वारंवार नागरिकांनी मागणी करूनही पोलीस कुठलीही कारवाई या वाहनचालकांवर करीत नसल्याचा आरोप परळीकर करीत होते. मात्र अचानक बुधवार दि १२ फेब्रुवारी पासून जिल्हा वाहतूक शाखा व परळी शहर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राणी लक्ष्मीबाई टॉवर, उड्डाण पुलावर वाहतूक पोलिस पथकाने कारवाई सुरू करत कर्णकर्कश आवाजाचे सायलेन्सर, फॅन्सी नंबर प्लेट, वाहन परवाना तपासणी चालू केली. चौकात कधीही न दिसणारे पोलीस अचानक अवतरल्याने वाहनचालक अलगद पोलिसांच्या जाळ्यात सापडले. शहरातील नागरिकांना अनेक वर्षांपासून पोलिसाने अडवणे व चौकशी करणे याची सवय नसल्याने वाहनचालक व पोलिसांत वादविवाद या कारवाई दरम्यान होत होते. मात्र पोलिसांनी कडक भूमिका घेतल्याने अनेक वाहनचालकांनी निमूटपणे दंड देत आपली सुटका करून घेतली.या विशेष कारवाई दरम्यान पोलिसांनी जवळपास १३५ वाहनांवर कारवाई केली. यात ११ बुलेटचे सायलेन्सर काढणे, दादा,भाऊ,काका,आण्णा अशा फॅन्सी नंबरप्लेट लावल्याबद्दल वाहनांवर तर वाहन परवाना नसल्याबद्दल वाहनांवर कार्यवाही केली. या मोहिमेत वाहनचकांवर ८२ हजारची दंडात्मक कारवाई करण्यात आल्या असून या कारवाई मुळे परळी शहरातील सर्वसामान्य नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. सुसाट वाहनचालकांना चाप बसण्यासाठी वारंवार अश्या कडक कारवाया करण्यात याव्यात अशी अपेक्षा व्यक्त करत आहेत.

या कारवाईत बीड वाहतूक पोलीस उपनिरीक्षक वासुदेव मिसाळ,पोउनि.अमोल शिंगणे,श्रीकांत राठोड सूरज घोळवे,हवालदार नारायण दराडे, पोलीस कॉन्स्टेबल ,नितीन काकडे,भारत जावळे,वसीम शेख,नारायण वाघमारे परळी शहर वाहतूक शाखेच्या या कार्यवाही बद्दल सर्व नागरिकाकडून परळी शहर वाहतूक पोलिसांचे कौतुक व अभिनंदन होत आहे,

# मनातले शिक्षक या लेखसंग्रहात शेख अब्दुल रहीम यांचे लेखाची निवड!

## ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री. रमेश मुक्ता विठ्ठल ठाकूर सर यांच्या हस्ते शेख अब्दुल रहीम सर यांचा सन्मान!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**



छत्रपती संभाजीनगर येथे दुसरे शिक्षक साहित्य संमेलनात प्रसिद्ध मनातले शिक्षक लेखसंग्रहामध्ये शेख अब्दुल रहीम सरांचा लिखित लेख निवडला गेला आहे. शेख अब्दुल रहीम सरांनी त्यांचे जीवनातले आवडते शिक्षकांबद्दल आदर्श शिक्षक- श्री. नासेर खान पठाण हे लेख लिहून जिल्हा परिषद , छत्रपती संभाजीनगर शिक्षण विभागाला पाठविले होते. लेखाला मनातले शिक्षक या लेखसंग्रहामध्ये स्थान मिळाला होता त्याबद्दल शेख अब्दुल रहीम सर यांनी निवड समिती तसेच संपादक मंडळाचे मनपूर्वक आभार मानले. आज रोजी त्या बद्दल ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तसेच एक उत्कृष्ट सूत्रसंचालक, उत्कृष्ट अधिकारी श्री. रमेश मुक्ता विठ्ठल ठाकूर सर यांच्या शुभहस्ते आज शेख अब्दुल रहीम सरांना दुसरे शिक्षक साहित्य संमेलन मध्ये लेख निवडले गेल्याबद्दल तसेच सहभाग बद्दल जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर शिक्षण विभाग( माध्यमिक) तर्फे सन्मान पत्र, सन्मान चिन्ह आणि मनातले शिक्षक हे पुस्तक भेट देऊन सन्मान केले. त्याबद्दल शेख अब्दुल रहीम सरांनी जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या श्रीमती अश्विनी लाटकर मॅम, प्राथमिक शिक्षणाधिकारी श्रीमती जयश्री चव्हाण मॅम तसेच ज्येष्ठ शिक्षण विस्तार श्री. रमेश मुक्ता विठ्ठल ठाकूर सरांचे आभार मानले.

# समाज कल्याण विभाग नांदेड वृद्धाश्रम योजना असहाय जेष्ठांसाठी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पा.गायकवाड**



वृध्दापकाळ चांगल्या प्रकारे व सुखासमाधानाने घालविता यावा याकरीता ही योजना सुरु करण्यात आली आहे योजनेचे स्वरुप शासन मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्थामार्फत अनुदान तत्वावर वृध्दाश्रम चालविण्याची योजना सन १९६३ पासून कार्यान्वित आहे. संस्था-ही संस्था नोंदणी अधिनियम, १९६० व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १८५०अंतर्गत नोंदणीकृत असावी. सदर वृध्दाश्रमात अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचार करमणूक, मनोरंजनाची सोय मोफत करण्यात येते. वृध्दाश्रमात निराधार व निराश्रीत ६० व निराश्रीत ६० वर्ष वरील पुरुष व ५५ वर्ष वरील स्त्रीयांना प्रवेश देण्यात येतो. प्रत्येक वृध्दामागे परिपोषण अनुदान १ जानेवारी २०१२ पासून प्रतिमाह रु.६३०/- ऐवजी रु.९००/- या प्रमाणे देण्यात येते. वृध्दाश्रमाची प्रवेश संख्या कमीत कमी २५ आहे तसेच प्रत्येक वृध्दामागे इमारत बांधकाम अनुदान रु.७५०/- एकदाच दिले जाते.योजनांचा लाभ घेण्यासाठी व योजनांच्या माहितीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, नांदेड यांच्या कडे संपर्क साधावा असे कळविण्यात आले आहे.

# होमिओपॅथी उपचार; आरोग्याचे फलित-डॉ.अमृता कोटांबे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली । संतोष कदम**

होमिओपॅथीचे जनक म्हणून ज्यांना ओळखले जाते त्या डॉ.सॅम्युअल हॅनेमन यांचा जन्म १७५५ मध्ये जर्मनमध्ये झाला. डॉ.सॅम्युअल हॅनेमन यांनी होमिओपॅथीच्या रुपात अशी काही औषध पद्धत विकसित केली की, जी शरीराच्या एकाच भागावर किंवा त्याच रोगावर उपचार करण्यासाठी वापरली जाते. आज जगभरात कोट्यवधी नागरिक होमिओपॅथीवर विश्वास ठेऊन त्याची उपचार पद्धत घेतात. ॲलोपॅथीद्वारे रोगांचे निदान करणे, चाचणी आणि उपचार करुन घेणे म्हणजे सर्वात विश्वासार्ह गोष्ट मानली जाते.आजही होमिओपॅथी म्हणजे हा रोग दाबून टाकणे होत नाही तर एकाद्या रोगाला मुळापासून दूर करण्यासाठी होमिओपॅथी विश्वासू गोष्ट मानली जाते. आज आम्ही तुम्हाला होमिओपॅथी का अंगीकारली पाहिजे आणि त्याचे काही महत्त्वाचे फायदे काय आहेत ते सांगू.

**होमिओपॅथी म्हणजे दुष्परिणामांची चिंता नाही**

औषधांमध्ये होमिओपॅथी ही सगळ्यात सुरक्षित प्रणाली मानली जाते, कारण त्याचे शरीरावर कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत. इंग्रजी वैद्यकशास्त्रात कोणत्याही रोगावर जर उपचार घेतला, त्यासाठी औषधं घेतली गेली तर त्याचे काही दुष्परिणाम हे होतातच. कोणत्याही रुग्णाने जर क्षयरोगावर उपचार घेतले तर त्याचा दुष्परिणाम म्हणजे त्याचा त्याचवेळी यकृतावर नकारात्मक परिणाम होतो. मायग्रेनसाठी जर तुम्ही सतत औषध घेतला तर त्याचा दुष्परिणाम म्हणजे ते रक्त पातळ करते. शरीरातील कोणत्याही वेदनेसाठी आपण जी पेनकिलर घेतो, पण ती घेत असलेली पेनकिलर ही शरीराची प्रतिकारशक्ती कमकुवत करत असते. मात्र होमिओपॅथीच्या बाबतीत असे होत नाही, आणि त्याचे कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत. होमिओपॅथी हे औषध ज्या आजारावर घेता तोच आजार ते बरे करते, दुसऱ्या कशावर त्याचा परिणाम होत नाही.होमिओपॅथिक औषधे व्यसनासारखी नसतातव्यसनाप्रमाणे असणारी इंग्रजी औषधांसारखी होमिओपॅथिक औषधे ही व्यसनासारखी नसतात, अशी अनेक इंग्रजी औषधे आहेत जी दीर्घकाळ सेवन केल्यामुळे शरीर त्याच औषधांवर पूर्णपणे अवलंबून होते. त्यामुळे कधी औषध न घेतल्यास अनेक दुष्परिणाम होतात. पण होमिओपॅथिक औषधांच्या बाबतीत असे होत नाही. दीर्घकाळ सेवन करूनही शरीराला त्यांची सवय लागत नाही.गर्भवती महिला, वृद्धांसाठी पूर्णपणे सुरक्षित काही औषधं ही रुग्णांच्या स्वभावावरही परिणाम करतात. होमिओपॅथिक औषधे मुळातच मूळ गुणधर्म ठेऊन तयार केली जात असल्याने त्याचा परिणाम मानवाच्या स्वभावावर होत नाही. त्यामुळे गर्भवती महिला, लहान मुले, आणि अगदी वृद्धांसाठीही पूर्णपणे सुरक्षित आहेत. त्यामुळे या औषधांचा शरीरावर कोणताही नकारात्मक प्रभाव पडत नाही.

**मधुमेही रुग्णांसाठी उपयुक्त**

मधुमेहामुळे त्रस्त असलेल्या रुग्णांसाठी इंग्रजी औषधे विपरित परिणाम करु शकतात. त्यामुळे जे कोणी मधूमेही रुग्ण असतील त्यांना सर्व प्रकारची औषधी देऊ शकत नाही. मात्र होमिओपॅथिक औषधांचे तसे नसते. ही औषधे मधुमेही रुग्णांसाठी पूर्णपणे सुरक्षित असतात.औषधे पूर्णपणे सुरक्षित होमिओपॅथिक औषधे लॅक्टोज असलेल्या लोकांसाठीही पूर्णपणे सुरक्षित आहेत. ते होमिओपॅथीची औषधेही आत्मविश्वासाने घेऊ शकतात. त्यांचा आरोग्यावर कोणताही दुष्परिणाम होणार नाही.

# संत रविदास जयंतीनिमित्त विविध सेवाभावी संस्था, महिला मंडळांच्या वतीने अभिवादन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । विष्णू मोहन पोले**



संत रविदास जयंतीनिमित्त बुधवारी (ता.१२) श्री संत रविदास राष्ट्रीय चर्मकार महासंघ, चर्मकार सामाजिक सेवाभावी संस्थेच्या येथील शाखेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन कार्यक्रमात शिवशांती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था निडेबन-उदगीर, जनक्रांती डोंगरी विकास बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अतनूर, जिजामाता महिला मंडळ अतनूर, वसुंधरा महिला मंडळ उदगीर, लातूर जिल्हा युवक कुणबी मंडळ उदगीर- अतनूर, साधुराम ग्रामीण विकास बहुउद्देशीय सेवाभावी संस्था च्या वतीने कार्यालयात व मुख्यालयात संत रविदास यांच्या तैलचित्राला शिवशांतीच्या अध्यक्षा चंचलाताई शिवाजीराव हुगे, दलित मित्र बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, सुनिता बालाजी माने, चंद्रभागा मधुकर वाघमारे, ललिता राम माने, मधुकर उद्धवराव वाघमारे, शिवराज खंडाजी कांबळे, ललिता सूर्यकांत मिंचे, महाराष्ट्र शासननियुक्त ग्राहक संरक्षण परिषदेचे शासन नियुक्त अशासकीय सदस्य बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, जनक्रांती डोंगरी विकास बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बी.जी.शिंदे, जिजामाता महिला मंडळाचे अध्यक्षा सौ.संध्या बालासाहेब शिंदे अतनूरकर, वसुंधरा महिला मंडळाचे अध्यक्षा सौ. रुक्मीन पांडुरंगराव सोमवंशी, साधुराम ग्रामीण विकास बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या उपाध्यक्षा मयुरी बालासाहेब शिंदे, पत्रकार संजय शिंदे, पत्रकार बालासाहेब गोविंदराव शिंदे यांनी पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक वक्ते तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष दलित मित्र बाळासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर संत रविदास यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकताना म्हणाले की, जीवनासाठी दिशादर्शक आहेत संत रविदास यांचे विचार असून आपले जीवन योग्य मार्गावर चालण्यासाठी संतांचे विचार खूप उपयुक्त ठरतात. असेच संत रविदास यांचे विचार आजच्या काळातही जीवनासाठी दिशादर्शक आहेत. संत रविदास जयंती निमित्त त्यांचे हे विचार खुपच प्रेरणादायी आहेत. भारतात अनेक संत होऊन गेलेत. शरीर रुपाने जरी ते नसले तरी त्यांच्या अमुल्य अशा विचारांच्या रुपाने ते आजही समाजाला दिशा देण्याचे काम करत आहे. आज १२ फेब्रुवारी रोजी संत रविदास जयंती आहे. व्या शतकातील भक्तियुगात माघी पौर्णिमेला काशीच्या मंडुआडीह गावातील रघू आणि कर्माबाई यांचे पुत्र म्हणून जन्माला आलेल्या या विभूतीने चर्मकाराचा वडिलोपार्जित व्यवसाय निवडला. पण त्यांनी आपल्या रचनांनी, विचारांनी ज्या समाजाचा पाया रचला तो खरोखरच अद्भूत आहे. चला तर त्यांच्या जयंतीनिमित्त जाणून घेऊया त्यांचे अनमोल विचार. केवळ कोणत्यातरी पूजनीय पदावर बसला आहे म्हणून कोणाचीही पूजा करू नये. जर त्या व्यक्तीमध्ये योग्य गुण नसतील तर त्याची पूजा करू नका. परंतु जर एखादी व्यक्ती उच्च पदावर बसलेली नसून तिच्यात योग्य गुण असतील तर अशा व्यक्तीची पूजा केली पाहिजे. आपण नेहमी आपले कार्य करत राहिले पाहिजे आणि फळ मिळण्याची आशा करु नये. कारण कर्म हा आपला धर्म आहे आणि फळ हे आपले भाग्य आहे. कोणतीही व्यक्ती मोठी किंवा लहान असते ती त्याच्या जन्मामुळे नाही तर त्याच्या कर्मामुळे. माणसाची कृती त्याला उच्च किंवा नीच बनवते. भ्रमात अडकलेला जीव भटकत राहतो. जो हा भ्रम निर्माण करतो तो मुक्तिदाता आहे. स्वतःमध्ये कधीही अभिमानाला जन्म घेऊ देऊ नका. एक छोटीशी मुंगी साखरेचे दाणे गोळा करू शकते पण तेच काम महाकाय हत्ती करू शकत नाही.

# संपणाऱ्या अर्थिक वर्षाच्या शेवटी सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत होणारे अनेक कामे निकृष्ट! नागरिकांच्या तक्रारीत वाढ

## संपणाऱ्या आर्थिक वर्षावर अधिकारी व गुत्तेदारांची नजर ;म्हणे,तक्रारीने काय फरक पडतो!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर अंतर्गत येणाऱ्या अनेक ठिकाणच्या कामांचा दर्जा ढासाळला असून गुत्तेदारांचे हित पहाण्याच्या नादात रस्ते, नाली, पूल, इमारती आदी कामे अतिशय दर्जाहीन होत असून अनेक तक्रारी होऊनही भोकर सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता व संबंधित कर्मचारी मात्र या सर्व प्रकाराकडे दुर्लक्ष करत असल्याचे विदारक चित्र दिसून येत आहे. माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या प्रयत्नातून भोकर तालुक्यामध्ये भोकर तालुक्यामध्ये कोट्यावधी रुपयांचे रस्ते,फुल, नाली असे विविध विकास कामे चालू असून ही कामे अतिशय निकृष्ट दर्जाचे अंदाजपत्रकास अनुसरून न करता मार्च एंडच्या तोंडावरती निधी हडप करण्याचा उद्देशातून



अनेक ठिकाणच्या कामत पाप होत आहे.

नागरिक म्हणतात..जांभळी फाटा ते बेंबर रस्ताचे काम निकृष्ट जांभळी फाटा ते बेंबर मार्गे होणारा रस्ता अंदाजपत्रकाला बगल देत करण्यात येत असून या ठिकाणी पूर्वीचा रस्ता खोदकाम न करता माती मिश्रित मुरूम टाकून, पाण्याचा वापर न करता अतिशय निकृष्ट दर्जाचे होत असल्याची ओरड नागरिकांमधून होत असतांनाही अधिकाऱ्यांना मात्र घाम फूटताना दिसत नाही.

तसेच गारगोटवाडी ते रामू नाईक तांडा या रस्त्याचची सारखीच अवस्था असून सदर काम निधी हडप करण्याचे उद्देशाने निकृष्ट पद्धतीने करून उरकण्यात आला असून अवघ्या काही दिवसातच ह्या रस्त्यांचे डांबर उखळायला सुरुवात झाली आहे .

साहेब म्हणतात.. तक्रारींनी काय फरक पडतो भोकर तालुक्यातील निकृष्ट कामाच्या संदर्भात तक्रारी होत असताना, तक्रारी आल्या म्हणून घाबरायचे नाही,तक्रारींनी काय फरक पडतो तुम्हाला ज्या पद्धतीने काम करायचे त्या पद्धतीने करा आम्ही आहोत ना सांभाळायला अशी पाठराखण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून केली जात असल्याने आपसूकच मस्तवाल गुत्तेदार सोकावले आहेत.

भोकर तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाचे बहुतांश अधिकारी कर्मचारी नांदेड येथूनच आपल्या कर्तव्याचा डोलारा सांभाळत असून टक्केवारीच्या नादात कामावर भेटी देऊन होत असलेल्या कामाचा दर्जा न पाहता बोगस डायऱ्या भरून, बिले उचलली जात आहेत. रिटायर्ड मर्जीतील कर्मचाऱ्यांना कामाच्या पर्यवेक्षणाची जबाबदारी देऊन डायरीत दौरे दाखवून शासनाच्या डोळ्यात धुळफे केली जात आहे. यातून रिटायर कर्मचारी व अधिकाऱ्यांचे मात्र फावले जात आहे.

**गारगोटवाडी (पां) ते रामुनाईक तांडा दरम्यान होत आसलेल्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत आसल्या बाबद , सार्वजनिक विभागाला वारंवार मोबाइलद्वारे कळवून देखील कुठलीही दखल घेतली गेली नाही, तेव्हा मी लेखी तक्रार दाखल केली आसता सार्वजनिक बांधकाम विभाग पर्यवेक्षक गुट्टे साहेब म्हणतात आशा कितीही तक्रारी आल्या तरी आम्हाला काही फरक पडत नाही.अशाने कुठलेही कामे थांबत नसतात. या वरुन सार्वजनिक बांधकाम विभागच टक्केवारीत मश्गूल होऊन गुत्तेदारांस पाठबळ देत आहेत असे वाटते. मी लवकरच सार्वजनिक बांधकाम मंत्री यांची भेट घेऊन या भ्रष्ट अधिकाऱ्यांची व बोगस काम करणाऱ्या गुत्तेदारांच्या विरोधात तक्रार देणार आहे.**
**–रोहिदास राठोड ,गारगोटवाडी (पां)**

### बाजारात सोयाबीनला हमीभाव पेक्षा कमी भाव; शेतकरी संकटात

# शेतकऱ्यांचे हजारो क्विंटल सोयाबीन घरातच पडून सोयाबीन खरेदीला मुदतवाढ द्या-नवनाथ चव्हाण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

यंदा प्रथमतः च नांदेड जिल्ह्यासह राज्यभरात हमी भावाने नाफेड मार्फत सोयाबीनची खरेदीस सुरूवात झाली.पाच एजन्सी कडून जिल्हाभरात पस्तीस च्या वर खरेदी केंद्रावर सोयाबीन खरेदी होत होती.बाजारात सोयाबीन चे दर घसरत गेल्यामुळे नतर नोंदणी कडे शेतकऱ्यांचा कल वाढला.शेतकऱ्यांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. शासनाने सदर बाबीची दखल घेऊन तातडीने सोयाबीन खरेदीला मुदतवाढ देऊन आता योग्य तो भाव द्यावा अशी मागणी शिवसेनेचे युवा नेते मा. पंचायत समिती सदस्य तथा सिनेट सदस्य नवनाथ रोहिदास चव्हाण यांनी पत्रकारांशी बोलतांना केली आहे.



नांदेड जिल्ह्यात सोयाबीनच्या शासकीय खरेदीत शेतकऱ्यांची कोंडी झाली.जिल्हात प्रमुख उत्पादक पिक म्हणून सोयाबीनचा उल्लेख होत आहे.सद्या बाजारात हमी भावाच्या खाली दर असल्याने शेतकऱ्यांचा शासकीय खरेदीकडे ओढा आहे.नाफेड आणि एनसीसीएफ या दोन प्रमुख खरेदीदार संस्थामार्फत सोयाबीनची हमीभावाने महाराष्ट्रात खरेदी केली जात आहे.परतू सोयाबीन उत्पादक शेतकरी हे शासनाच्या वेळ काढूपणामुळे अडचणीत सापडला आहे. नांदेड जिल्ह्यासह राज्यात नाफेड च्या माध्यमातून सोयाबीन खरेदी केली जात आहे. नोंदणी करूनही अनेक शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करण्यात आलेली नाही. नांदेड जिल्ह्यात किमान हमी दरानूसार सोयाबीन ची विक्री पुर्व नोदणी १५ आक्टोबर ते ६ जानेवारी पर्यंत सुरू होती.तसेच खरेदीची अंतिम तारीख ६ फेब्रुवारी असल्याने नोंदणीकृत शेतकऱ्यांचे हजारो क्विंटल सोयाबीन अजूनही घरातच पडून राहिले आहे. शासन हमी भावानूसार खरेदीस मुदतवाढ देण्यात यावी व शेतकऱ्यांची बाजारातील पिळवणूक थांबवावी अशी मागणी शिवसेना (उबाठा)चे युवा नेते मा. पंचायत समिती सदस्य तथा सिनेट सदस्य नवनाथ रोहिदास चव्हाण यांनी पत्रकारांशी बोलतांना केली आहे.

**जिल्ह्यात किमान हमी भावानूसार शासनाने १३लाख ५४ हजार ६६२ क्विंटल सोयाबीन ची खरेदी केली.त्यासाठी नोंदणी केलेल्या ९२ हजार २१३ शेतकऱ्यांपैकी ९० हजार ६६४ शेतकऱ्यांना खरेदी संदर्भात संदेश आले आहेत.परंतू अद्याप १५५४ शेतकऱ्यांना संदेश न आल्याने हजारो क्विंटल सोयाबीन पडून राहिले आहे.शासननाने मुदतवाढ दिली नसल्याने एकट्या नांदेड जिल्ह्यात १ लाख ३ हजार ४९७ क्विंटल सोयाबीन खरेदीचे लक्षांक शिल्लक राहिले आहे.**

# त्यागमूर्ती रमाई यांना जयंतीनिमित्त अभिवादन!



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव मही । प्रतिनिधी**

सम्राट अशोक बहुउद्देशीय महिला विकास संस्थेच्या वतीने त्यागमूर्ती माता रमाई यांची जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले.यावेळी संस्थेच्या पदाधिकारी उपस्थित होत्या. प्रथम सम्राट अशोक बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्ष शशिकलाबाई हिवाळे यांनी रमाई यांच्या जीवनातील त्याग, आणि संघर्ष संदर्भात माहिती विशद केली. याप्रसंगी सचिव मंगलाबाई खिल्लारे,मिनाबाई हिवाळे,चंद्रकलाबाई हिवाळे,कमलाबाई खिल्लारे,संध्याबाई हिवाळे,इंदुबाई हिवाळे,मंदाबाई खिल्लारे,कांचन खिल्लारे,पुष्पाताई हिवाळे आदी महिलांनी माता रमाई यांना अभिवादन केले.

# परळीत पोलिसांच्या आशीर्वादाने हातभट्टी विक्रेत्यांचा नंगानाच ;दोन वर्ष लढा देऊन देखील पोलीस कारवाई करेणा

### परळीतील शिष्टमंडळ आलं पोलीस अधीक्षकांना भेटण्यास

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

परळी तालुक्यात गेल्या ३० ते ३५ वर्षापासून हातभट्टी वाल्यांचा वेळखा वाढत चालला आहे यासाठी गेल्या दोन वर्षांपासून अनेक नागरिक या हातभट्टी बंद करण्याच्या मागण्या करत आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात परळीत आंदोलन देखील करण्यात आली मात्र पोलिसांनी फक्त आश्वासन दिले यामध्ये नागरिक थेट आता पोलिसांच्याच आशीर्वादाने परळीतील हातभट्टी चालत असल्याचा आरोप करत आहे. यासाठी आज परळीतील एक शिष्ट मंडळ पोलीस अधीक्षक यांना निवेदनाद्वारे परळीतील हातभट्टी बंद करण्यात यावी अशी मागणी केली आहे. बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांना भेटण्यासाठी शिष्टमंडळात वैजनाथ जगतकर माजी नगराध्यक्ष, नितीन रोडे, सोपान ताटे, संजय जगतकर, बालासाहेब गायकवाड, भैय्यासाहेब आदोडे, महादेव रोडे, रवी रोडे,अंबादास रोडे, रवींद्र रोड, शीलभद्र ताटे, अनंत कांबळे, भेट घेतली व सविस्तर चर्चा केली. निवेदन पण देण्यात आले आहे. यावेळेस परळीतील पोलीस अधीक्षक यांना भेटण्यास आलेल्या नागरिकांनी मोठा संताप व्यक्त केलेला पाहायला मिळतोय आता नेमकं या शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनाला पोलीस अधीक्षक हे साथ देणार का या हातभट्टी गेल्या अनेक वर्षांपासून परळीतील युवकांचा जीव घेताय हे थांबणार का हे पाहणं गरजेचं आहे.गणेश पार येथे बंद पडलेली पोलीस चौकी काल रात्री देवी मंदिर परिसरात देण्यात यावी अशी मागणी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याकडे केली आहे. एका महिन्याभरात कारवाई न झाली तर पोलीस अधीक्षक कार्यालया समोर आंदोलन करण्यात येणार आहे. असेही सांगितले.



# जीवनगौरव पुरस्कार म्हणजे सासुरवाडीचा बहुमान–मा.मंत्री सुधीर मुनगंटीवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव माधव । बैलकवाड**

महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेच्या वतीने मला दिलेल्या जीवन गौरव पुरस्कार म्हणजे सासुरवाडीच्या बहुमान असून सत्कार आशीर्वाद प्रेम तो आनंद सातपट द्विगुणीत असतो असे उद्गार राज्याचे माजी मंत्री तथा आमदार सुधीर भाऊ मुनगंटीवार यांनी त्यांना देण्यात आलेल्या जीवनगौरव पुरस्कार सत्कार सोहळ्यात आपले विचार व्यक्त केले.

सदर पुरस्कारात मुनगंटीवार यांना सह पत्नीक सन्मान चिन्ह, मानपत्र,व एक लाख रुपयांचा धनादेश प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आला, हा पुरस्कार सोहळा वासवी भवन नांदेड आयोजित करण्यात आला होता कार्यक्रमाचे अध्यक्ष खा. अशोक चव्हाण तर दुसरा पुरस्कार उत्कृष्ट संसद पटू पुरस्कार म्हणून हिंगणघाटचे आ.समीर कुणावार, यांना सन्मान चिन्ह प्रमाणपत्र देऊन करण्यात आला या प्रमुख अतिथी सौ सपनाताई मुनगंटीवार,आ.अमरभाऊ राजूरकर, हे होते कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख मान्यवरांच्या हस्ते वासवी माता व रंगनाथ महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले, प्रास्ताविक महासचिव गोविंदराव बिडवई यांनी मांडले . अशोकराव चव्हाण म्हणाले की सुधीरभाऊ मुनगंटीवार व माझे संबंध मित्रत्वाचे असून त्यांनी अर्थमंत्री व वनमंत्री असताना चांगल्या प्रकारे कारभार सांभाळला महाराष्ट्रात इतिहास घडवून महाराष्ट्राची तिजोरी नियोजनबद्ध हाताळले व सर्वसामान्याला न्याय देण्याचे काम




केले सुधीर जी आपणास श्रेष्ठ दिला कारण विराट कोहली आयपीएल मध्ये चांगल्या बॅटिंग खेळल्यानंतर त्याला रेस्ट दिला जातो तसा आपणास पक्षाने रेस्ट दिला असून तो रेस्ट संपल्यानंतर विराट कोहली सारखे षटकार मारून आपण पुन्हा राजकारणात बॅटिंग कराल अशी खात्री मला आहे,असे ते म्हणाले. स्वागताध्यक्ष महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार तर कार्याध्यक्ष भानुदास वट्टमवार महासचिव गोविंदराव बिडवई, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर महाजन, तसेच बांधकाम समिती अध्यक्ष डॉ सूर्यकांत शिरपेवार, कार्याध्यक्ष सुमित रुद्रवार सचिव सदानंद मेडेवार ,कोषाध्यक्ष अनिल मनाठकर, महिला अध्यक्ष माधुरीताई कोल्हे, सचिव बबितातार्इ अष्टीकर ,कार्याध्यक्ष सुलभाताई वट्टमवार, सल्लागार एकनाथ मामडे ,डॉ. डी आर मुखेडकर, पुणे जिल्हाध्यक्ष काप्रतवार,महासभेचे उपाध्यक्ष दिलीपराव कंदकुर्ते, नंदकुमार मडगुलवार, सखाराम निलावार, सुधीर पाटील सहसचिव प्रणव मनुरवार, कोषाध्यक्ष लक्ष्मीकांत मुक्कावार, प्रसिद्धी प्रमुख गजानन चौधरी ,डॉ विजय बंडेवार ,किरण मुक्कावार व प्रमुख संघटक प्रमुख प्रदीपजी कोकडवार, सदस्य विलास कोडगिरे ,राम पत्तेवार ,उत्तम अण्णा चौधरी, विजयकुमार कुंचनवार , साईनाथ मेडेवार,महेश पत्तेवार, रमाकांत रायेवार, सुरेश पोकलवार, प्रशांत पोपशेटवार, प्रभाकर पत्तेवार, गजानन बंडेवार,

### बीड ग्रंथोत्सवामधील परिसंवादात माध्यम विषयावर चर्चा

# समतोल व संतुलित समाज रचनेसाठी साहित्यिकांचे मोलाचे योगदान-उत्तम बोडखे

## भाषेवर प्रभुत्व मिळविल्याने जीवनात यशस्वी होता येते-अशोक तांगडे

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

साहित्यात समाजाचे प्रतिबिंब उमटते; रंजल्या गांजल्या दीनदलित दुबळ्या अनाथ अपंग, शेतकरी शेतमजूर युवा वर्ग आणि वंचित घटकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कर्तव्य साहित्य करते किंबहुना या अनुषंगाने विविध अंगी साहित्यातून मानवी समाज व्यवस्थेला समतोल आणि संतुलित ठेवण्याचे मौल्यवान कार्य घडते! असे अभ्यासपूर्ण विवेचन जेष्ठ पत्रकार तथा दैनिक झुंजारनेताचे उपसंपादक उत्तम बोडखे यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग अंतर्गत ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय बीड यांच्यावतीने आज बुधवारी शिरूर का. येथे बीड ग्रंथोत्सव २०२४ च्या परिसंवाद कार्यक्रमात 'मराठी भाषा उद्योग कला व माध्यमामधील संधी' या विषयावर भाष्य करताना विविध उदाहरणे आणि दाखले देत पत्रकार उत्तम बोडखे यांनी मराठी भाषा आणि माध्यमांमधील संधी अनुषंगाने विस्तृत विवेचन मांडले.ज्येष्ठ पत्रकार दादासाहेब मुंडे, व्यंकटेश वैष्णव,अशोक तांगडे, प्रा.डॉ.अशोक घोळवे,प्रा.डा.सोपान सुरवसे,अभिनेता विष्णु केदार आदीसह मान्यवर माध्यम क्षेत्रातील प्रतिनिधींनी आपल्या विचाराच्या माध्यमातून साहित्य आणि माध्यम यामधील सुसंवाद संबंध आणि गरज या अनुषंगाने चर्चा घडवून आणली.यावेळी ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून मराठी भाषा,उद्योग,कला व माध्यमातून संधी या विषयाला धरून आपले विचार मांडले.उत्तम बोडखे म्हणाले की,साहित्यिकांनी आपल्या साहित्यातुन सभोवतालचे प्रश्न मांडण्याची आवश्यकता आहे. मनातील भाव संवेदना व्यक्त करण्यासाठी कथा कविता असतातच;समाजप्रबोधन करण्यासाठी साहित्य हेही महत्त्वाचे साधन आहे.साहित्यिकांनी आपल्या साहित्यातुन सभोवतालचे प्रश्न मांडण्याची




आवश्यकताही पत्रकार उत्तम बोडखे यांनी व्यक्त केली.नवोदितांना लिहिण्याची प्रेरणा मिळत आहे. अनुभवावर आधारित कथा, काव्य लेखन समाजावर प्रभाव पाडू शकते,साहित्यिकांना कमीत कमी शब्दात आपले भावविश्व उलगडता आल पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करून साहित्यिकांना त्यांच्या मौल्यवान शब्दाचा वृत्तपत्र आणि इतर माध्यम क्षेत्रातून व्यापक प्रसिद्धी देऊन समाजाच्या भल्यासाठी आणि समतोल संतुलित समाज रचना ठेवण्यासाठी हातभार लावण्याची गरज आहे साहित्य आणि पत्रकारिता एकाच नाण्याच्या दोन बाजू असून समाज रचनेमध्ये या दोन्ही घटकांना सन्मानपूर्वक स्थान देण्याची गरज आहे शासन आणि समाज यांनी साहित्यिक आणि माध्यमिक क्षेत्रातील प्रतिनिधी यांच्या अनुषंगाने सकारात्मक निर्णय घेऊन बुद्धिमान माणसे या क्षेत्रात येतील आणि राहतील याची काळजी घेण्याची गरज असल्याचेही वास्तव त्यांनी अधोरेखित केले. परिसंवादाचे अध्यक्षपदावरून ते बोलत होते.

परिसंवादाचे बहारदार सुत्रसंचलन प्रा.डा.भास्कर बडे यांनी तर ग्रंथालय अधिकारी म्हस्के यांनी उपस्थितीतांचे आभार मानले. यावेळी तांगडे म्हणाले की, आमच्या कुंटुबात मराठी,हिंदी व इंग्रजी भाषा अवगत आहे. भाषेमुळे आम्हांला आर्थिक सुबत्तता आलेली आहे.मराठीची भाषेची मावशी व मामी हिंदी व इंग्रजी आहे.फक्त भाषेचे महत्व कळुन चालणार नाही.वेळेचेही महत्त्व कळाले पाहिजे.मराठी माणसाने स्वभाव बदलावा लागेल.मी महाराष्ट्र शासनाचा ग्रेड वन चा ट्रेनर आहे.माझ्या गाडीत छोटं ग्रंथालय आहे.वाचन आहे तर ज्ञान आहे हे विसरु नका.भाषेत मोठी ताकत आहे.भाषा पैसे कमवुन देते,उदा.इंदुरीकर महाराज काय करतात? आपणही बोलभांडवली माणुस आहे.फक्त बोलण्यवर जीवन जगु शकतो आसे अशोक तांगडे यांनी यावेळी सांगीतले.

# शिरशी बु येथे श्री भक्ती लिंग मलीनाथ देवस्थान अखंड शिवनाम सप्ताहास प्रारंभ

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**आंबुलगा | सुर्यभान बिजलगावे**

शिरशी बु .ता.कधार येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही मल्लिनाथ देवस्थानच्या अखंड शिवनाम सप्ताहाला आज दिं.१४ फेब्रुवारी २०२५ रोज शुक्रवारी या दिवशी सुरू होणार अशी माहिती मल्लिनाथ देवस्थानच्या वतीने देण्यात आले आहे. सप्ताह कार्यक्रमाचे यंदा दुसरे वर्ष असून यावर्षी महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार येणार आहेत. सप्ताहात नामवंत किर्तनकारांची कीर्तन सेवा होणार आहे.दिं १४ फेब्रुवारी रोजी शि. भ .प . संगीताताई संतोष बेंद्रीकर यांचे कीर्तन होईल,दिं.१५ फेब्रुवारी रोजी शि. भ. प . नागेश महाराज विभुते दमईवाडी यांचे कीर्तन होईल,दिं.१६




फेब्रुवारी रोजी शि.भ.प.विकास महाराज धसवाडीकर यांचे कीर्तन होईल,दिं.१७ फेब्रुवारी रोजी शि.भ.प. स्वातीताई माधव दापकेकर यांचे कीर्तन होईल,दिं.१८ फेब्रुवारी रोजी शि.भ.प .शिवकांत पळसकर लोहा यांचे कीर्तन होईल,दिं.१९ फेब्रुवारी रोजी शि.भ. प . श्रीदेवी भीमाशंकर कापशीकर यांचे कीर्तन होईल,दिं.२० फेब्रुवारी रोजी शि.भ. प .सखाराम सोनटक्के पाखडेवाडी यांचे होईल दिं २१ फेब्रुवारी रोजी शेवटचे काल्याचे कीर्तन शि.भ.प. तानाजी पा.थोटवाडीकर यांच्या किर्तनाने सप्ताह चा समारोप होईल. व सायंकाळी सहा वाजता सद्गुरु श्री मल्लिनाथ महाराज यांचे दर्शन होईल त्यानंतर भव्य महाप्रसादाचा कार्यक्रम होईल.तरी या सप्ताह कार्यक्रमास शिर्डी बू पंचक्रोशीतील भाविक भक्त, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तनाच्या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन मल्लिनाथ शिवलीग ट्रस्टच्या वतीने व शिरशी बु गावकरी सप्ताह समितीने केले आहे.

# शिराढोण येथे प्रवाशी बस निवारा उभारण्याची गरज

### बसची वाट पाहत असताना प्रवाश्यांची हेळसांड

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**शिराढोण | दौलत पांडागळे**



कंधार तालुक्यातील शिराढोण हे जवळपास १० ते १२ हजार लोकसंख्या असलेले गाव आहे.गावात मोठी बाजारपेठ असून अनेक शासकीय कार्यालय , बँका , शाळा,कॉलेज,धार्मिक मंदिरे असून नेहमी लोकांची ये जा सुरू असते.अशा वेळी बाहेर गावी ये जा करत असताना प्रवाशांना मात्र बस ची वाट पाहत असताना अनेक गोष्टींचा सामना करावा लागत आहे.

शिराढोण बसस्थानक ते गावाचा अंतर अंदाजे ५०० मीटर आहे व गावातून आलेले प्रवाशी किंवा बाहेर गावचे प्रवाशी बस स्टॉप ला आले असता त्यांना कुठेही आणि कसलाही आसरा किंवा निवारा नाही अश्या वेळी त्यांना रस्त्याच्या कडेला तासनतास बस ची वाट पाहत बसावी लागते व त्यामध्ये ऊन,वारा, पाऊस याचा सामना पण हे प्रवाशी करतात.खाजगी प्रवाशी वाहनांची रेलचेल सुद्धा शिराढोण बस स्टॉप वर असून ते वाहने कुठल्याही नियमाचे पालन न करता आपले वाहने रस्त्याच्या मध्यभागी उभी करतात या सर्व बाबी विचारात घेता शिराढोण बस स्थानक येथे जिल्हा मध्यवर्ती परिवहन महामंडळाच्या वतीने एक प्रवाशी निवारा उभारून प्रवाश्यांची होणारी हेळसांड थांबवावी.

# मातृतीर्थावरील साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद हा सर्वात मोठा बहुमान-डॉ.गणेश गायकवाड





**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**बुलढाणा | प्रतिनिधी**

मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे, बहुजन साहित्य संघ, चिखली, जि. बुलढाणा च्या वतीने दि. ३१ मार्च, २०२५ रोजी आयोजित तसेच बहुचर्चित सहाव्या बहुजन साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद स्विकारावे यास्तव, दि. ११ – ०२ – २०२५ रोजी संघाचे सचिव तथा सामाजिक सेवेसाठी साऊथवेस्टर्न अमेरिकन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट प्राप्त डॉ. डी. व्ही. खरात सर तसेच भावकवी अंकुश पडघान यांच्या सह अध्यक्ष तथा आपल्या प्रदीर्घ समाजकार्यामुळे अमेरिकन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित डॉ. विजयकुमार कस्तुरे, डव्होकेट, चिखली यांनी सबंध भारतभर सुप्रसिद्ध असलेल्या तथा उर्दू शायरीस वाहून घेतलेल्या आणि यशस्वी शल्यचिकित्सेसाठी ख्यातनाम असलेल्या बुलढाणा येथील ज्येष्ठ साहित्यिक डॉ. गणेश गायकवाड यांची भेट घेऊन, नुकत्याच अबूधाबी येथील गौरवास्पद कार्यक्रमात सन्मानित झाल्याबद्दल त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून उपरोक्त नियोजित साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी स्विकारावे यास्तव सविस्तर चर्चा करून नम्र विनंती सुध्दा केली. आणि त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याकारणाने आज ब. सा. संघाचे अध्यक्ष, डॉ. विजयकुमार कस्तुरे, सचिव डॉ.डी. व्ही. खरात सर, उपाध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक कवी तथा आपल्या समृध्द परकायाप्रवेशी कथाकथनासाठी साऊथवेस्टर्न अमेरिकन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट प्राप्त कथाकार डॉ. बबनराव महामुने, छ. संभाजीनगर, सल्लागार तथा ग्रामीण साहित्य चळवळ, बुलढाणा चे अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक कवी कडूबा बनसोड, नागनगाव, ता .देऊळगाव राजा, सल्लागार तसेच ज्येष्ठ साहित्यिक कवी व संपादक तथा सामाजिक सेवाभावी कार्यकर्ते प्रा.भास्कर इंगळे, बुलढाणा, सल्लागार व चळवळीतील सक्रिय धडाडीचे सेनानी एस. बी. शिंदे आणि पदाधिकारी अंकुश पडघान असे ब. सा. संघाच्या नूतन कार्यकारिणीच्या सर्व मान्यवर पदाधिकारी मंडळींनी मिळून, ब. सा.सं. च्या वतीने उपरोक्त नियोजित साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आल्याबद्दल चे सर्वांच्या सह्यांचे लेखी पत्र, डॉ. गणेश गायकवाड यांना त्यांच्या निवासस्थानी जाऊन प्रदान करून पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान व सत्कार केला तसेच हार्दिक अभिनंदन करण्यात आले. त्याप्रसंगी डॉ.गणेश गायकवाड यांनी वरील प्रमाणे उदगार काढले. त्यांच्या या निवडीबद्दल सबंध महाराष्ट्रच नव्हे तर देशभरातील साहित्यिक, नागरिक तथा विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग एम.पी.एस सी परीक्षेत पेडगावच्या शिरपेचात मानाचा तुरा दोन सख्या बहिणींनी केले यश संपादन

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**श्रीगोंदा | ज्ञानेश्वर येवले**

महाराष्ट्र राज्यातील घेण्यात आलेल्या स्पर्धा परिक्षा २०२३-२४ मध्ये लोकसेवा आयोग (MPSC) मार्फत् महसूल सहाय्यक पदी (Revenue Assistent) श्री यासिन जानमोहम्मद इनामदार यांच्या दोन्ही सुकन्या कुमारी/ जास्मिन यासिन इनामदार व कुमारी लैला यासिन इनामदार या दोन्हींनी अतिशय खडतर प्रवास करून घवघवीत यश संपादन केले.

श्रीगोंदा तालुक्यातील पेडगांव या गावातील श्री यासिन जानमंहम्मद इनामदार शेतकरी कुटुंबातील असून हलकीच्या परिस्थितीतून मुलाप्रमाणे मुलींना ही शिक्षणासाठीआई हामिदा यासिन इनामदार यांनी मुले-मुली एकसमान व मुले-मुली भेदभाव न करता गरीब परस्थितीतून मुलांसारखेच मुलींना शिक्षण देऊन त्यांच्या या आधार स्तंभा मुळे यश संपादन केले आई वडिलांनी व त्यांच्या बहिणी घेतलेल्या कष्टामुळे या दोन सख्या बहिणींना यश संपादन करण्यासाठी मदत मिळाली

याशिन जान महंमद ईनामदार यांनी आपल्या सर्वच मुलींना शिक्षणात कुठल्याही प्रकारची कमतरता भासू दिली नाही इतकेच नव्हे तर त्यांच्या कन्या रुबीना



याशीन इनामदार या जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षका आहेत निलोफर यासीन इनामदार प्राथमिक शिक्षका आहेत हिना याशीन इनामदार ही आयटी सॉफ्टवेअर डेव्हलपर्र

या क्षेत्रात कार्यरत आहेत व आत्ता नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य स्पर्धा परीक्षेमध्ये लोकसेवा आयोग एम पी एस सी च्या परीक्षेत कुमारी जास्मिन इनामदार व कुमारी लैला इनामदार या दोन्ही सख्या बहिणीची भर पडली आहे त्यांच्या कर्तुत्वा मुळे तालुक्यात सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904